# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक

**विषय**:महाविद्यालयांची/संस्थांची बँक खाते विषयक माहिती संकेतस्थळावर अद्ययावत करण्याबाबत.

**संदर्भ : परिपत्रक क्र. वित्त/२०१७-१८/१७०८, दि. ३०.१२.२०१७ व**
**वित्त/२०१८-१९/२४८ दि.१८ मे, २०१८**

महाविद्यालयांची/संस्थांची बँक खाते विषयक माहिती संकेतस्थळावर अद्ययावत करण्याबाबत वरील संदर्भांकित परिपत्रक काढण्यात आले होते. या परिपत्रकास अनुसरून महाविद्यालयांनी/संस्थांनी अत्यल्प प्रतिसाद दिलेला दिसत आहे. आतापर्यंत २५% महाविद्यालयांनी/संस्थांनी बँक खात्याची माहिती अद्ययावत केलेली आहे. उर्वरित महाविद्यालयांनी/ संस्थांनी माहिती अद्ययावत न केल्यामुळे विद्यापीठास महाविद्यालयाच्या/संस्थांच्या खात्यामध्ये रक्कम वर्ग करण्यासाठी RTGS/NEFT चा वापर करणे अडचणीचे होत आहे. अद्यापपर्यंत ज्या महाविद्यालयांनी/संस्थांनी आपल्या बँक खात्याची माहिती अद्ययावत केलेली नाही, अशा सर्व महाविद्यालयांना/संस्थांना पुनश्च निर्देशित करण्यात येते की, विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, गुणवत्ता सुधार योजना व परीक्षा विभाग अशी सर्व आपली बँक खाते विषयक माहिती त्वरित सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात यावी. त्याची लिंक खालील प्रमाणे आहे.

**Steps for Filling Details:-** Login with **BOD Portal** --> Select **College Details** menu --> Select **Finance Bank Details** Menu --> Click on**Apply for New Entry** Button one by one.

ऑक्टो/नोव्हे २०१८ च्या परीक्षा उचल रक्कम तसेच इतर कोणतीही रक्कम महाविद्यालयास धनादेशाद्वारे अदा केली जाणार नाही. कृपया याची नोंद द्यावी व वित्त व लेखा विभागास या संदर्भात सहकार्य करावे.

(सीए (डॉ.) विद्या गारगोटे) 26/9
वित्त व लेखा अधिकारी
अतिरिक्त कार्यभार

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. परीक्षा वित्त/२०१८-१९/1026
दिनांक : २६ सप्टेंबर, २०१८

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

मा. प्राचार्य/ संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था

D:\Dr.Bhagwat\marathi Letter